विद्याविकास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
स्वररंग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/३१२ **अत्यंत महत्वाचे व कालमर्यादेचे** दिनांक : १२/०४/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित **पुणे जिल्हयातील**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ युवकांसाठी विशेष मतदार नोंदणी अभियान राबविणेबाबत.**
**संदर्भ : उभूसंक्र. १३/आस्था–१/कावि/१०७/२०२४ दिनांक ११ एप्रिल, २०२४ चे पत्र.**

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाचे निरीक्षक यांनी दि. १०/०४/२०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये पुणे जिल्हयातील मतदार यादीमध्ये १८ ते १९ व २० ते २९ वयोगटातील युवा मतदार यांची नोंदणी अल्प प्रमाणात असल्याने त्यांची नोंदणी करण्याकरिता विशेष मोहिम राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने पुणे जिल्हयातील (**३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून**) सर्व महाविद्यालयांमध्ये **दि. १२/०४/२०२४ ते १५/०४/२०२४** या कालावधीमध्ये युवा मतदार नोंदणी अभियान राबविण्याबाबत निर्देश दिले आहेत. मतदार नोंदणी अर्ज हे ऑनलाईन स्वरूपात देखील भरता येणार असून हे अर्ज https://voters.eci.gov.in/ या लिंकवरून भरता येणार आहे. तसेच Voter Search Helpline App द्वारे देखील भरता येणार आहेत. सदर ॲप मोबाईलवर Play Store वरून डाउनलोड करता येणार आहे. मतदार नोंदणीसाठी रहिवासी पुरावा म्हणून लाईट बिल/पाणी पट्टी बिल, आधारकार्ड, बॅकेचे किंवा पोस्टाचे पासबुक, भारतीय पारपत्र (Passport), नोंदणीकृत विक्रीखत नोंदणीकृत भाडे करार, वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्य शिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे जोडण्यात यावीत.

शासन निर्देशानुसार पुणे जिल्हयातील (**३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून**) आपण आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेत दि. १२/०४/२०२४ ते १५/०४/२०२४ या कालावधीमध्ये युवा मतदार नोंदणी अभियान आपल्या स्तरावर राबविण्यात यावे. सदर विशेष मतदार नोंदणी अभियानाबाबत महाविद्यालय/परिसंस्थांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना एसएमएस, Whatsapp group, तसेच आपल्या संकेतस्थळाद्वारे माहिती देण्यात यावी. या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून आयोजन करणेबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

विशेष मतदार नोंदणी अभियानामध्ये होणाऱ्या नव युवा मतदार नोंदणीचा दैनंदिन अहवाल पत्रात दिलेल्या तक्त्यानुसार नोंदवून slopune13@gmail.com या इ–मेल वर सादर करण्याबाबत संबंधितांस सूचित करावे. तसेच सदर अभियान **दि. १५/०४/२०२४ पर्यंतच** राबविण्यात यावे, याची दक्षता घ्यावी. कळावे हि विनंती.

सोबत : वरिलप्रमाणे



(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

SVEEP

सत्यमेव जयते

उत्सव निवडणुकीचा
अभिमान देशाचा


**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे कार्यालय,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बि विंग, पुणे - १**
**इमेल आयडी - slaopune१३@gmail.com**


---

दिनांक -११ /४/२०२४

क्र. उभूसंक्र. १३/आस्था-१/कावि/९०८ /२०२४

**<u>निवडणूक तात्काळ</u>**

**प्रति,**

१. कुलुगुरू
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे
पुणे ४११००१
३. विभागीय सहसंचालक तंत्र शिक्षण,
पुणे विभाग, पुणे
पुणे ४११००१
४. शिक्षण अधिकारी
जिल्हा परिषद,पुणे-०१
५. शिक्षण अधिकारी
पुणे महानगरपालिका, पुणे – ०५
६. शिक्षण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

**विषय:- <u>लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४</u>**
**युवकांसाठी विशेष मतदार नोंदणी अभियान राबविणेबाबत**
**(३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून).**

मा. भारत निवडणूक आयोगाचे निरीक्षक यांनी दि. १०/०४/२०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये पुणे जिल्ह्यातील मतदार यादीमध्ये १८ ते १९ व २० ते २९ वयोगटातील युवा मतदार यांची नोंदणी अल्प प्रमाणात असल्याने त्यांची नोंदणी करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील (**३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून**) सर्व महाविद्यालयांमध्ये **दि. १२/०४/२०२४ ते १५/०४/२०२४ या कालावधीमध्ये** युवा मतदार नोंदणी अभियान राबविण्यात यावे. मतदार नोंदणी अर्ज हे ऑनलाईन स्वरुपात देखील भरता येणार असून हे अर्ज https://voters.eci.gov.in या लिंकवरून या लिंकवरून भरता येणार आहेत. तसेच Voter Search Helpline App द्वारे देखील भरता येणार आहेत. सदर अप मोबाईलवर play store वरून डाउनलोड करता येणार आहे. मतदार नोंदणीसाठी रहिवासी पुरावा म्हणून लाईट बिल/पाणी पट्टी बिल, आधारकार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पासबुक, भारतीय पारपत्र (Passport), नोंदणीकृत विक्रीखतम नोंदणीकृत भाडे करार, वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्य शिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे जोडण्यात यावीत.

सदर विशेष मतदार नोंदणी अभियानाबाबत महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना एसएमएस, whatsapp group तसेच आपल्या संकेतस्थळाद्वारे माहिती देण्यात यावी.

विशेष मतदार नोंदणी अभियानामध्ये होणाऱ्या नव युवा मतदार नोंदणीचा दैनंदिन अहवाल खालील नमुन्यात इकडील कार्यालयास slaopune13@gmail.com या ई-मेल वर सादर करण्यात यावा.तसेच सदर अभियान **दि. १५/०४/२०२४ पर्यंतच** राबविण्याची दक्षता घेण्यात यावी.

| **अ.क्र.** | **दिनांक** | **केलेली मतदार नोंदणी संख्या** | |
|---|---|---|---|
| | | **१८-१९ वयोगट** | **२०-२९ वयोगट** |
| | | | |

( डॉ. सुहास दिवसे ) ११/४
जिल्हाधिकारी, तथा
**जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे**

प्रत:-

१) उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांना माहितीसाठी

२) मतदार नोंदणी अधिकारी व सहा.मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सदर उपक्रमाचे राबविताना आपले मतदार संघातील सर्व महाविद्यालयांशी समन्वय साधून उपक्रमांचे आयोजन करताना मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून कामकाज पाहावे. **(३५ लोकसभा मतदार संघातील १९९ दौंड, २०० इंदापूर,२०१ बारामती, २०२ पुरंदर, २०३ भोर, २११ खडकवासला यांनी सदर विशेष युवा मतदार नोंदणी अभियान राबवू नये याची नोंद घ्यावी.)**